# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date: 17 April 2024**

**Time: 01.00 to 01.05 PM**

**Language Marathi**

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १७ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार आज संपत आहे. या टप्प्यात १७ राज्यातल्या १०२ मतदारसंघांमध्ये परवा १९ तारखेला मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली-चिमूर या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदानासाठी यंत्रणा सज्ज होत असून, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व प्रयत्न केले जात आहेत.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात पूर्वीच्या निवडणुकीत मतदानाची कमी टक्केवारी नोंदवणाऱ्या भागांकडे विशेष लक्ष पुरवण्यात येत आहे. मतदारांना प्रेरित करण्यासाठी विविध उद्योगांची मदत घेऊन ८५ मतदान केंद्रं सजवण्यात आली आहेत.

****

रामटेक इथं काल महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभा घेतली.

भंडारा गोंदिया लोकसभा मतदरासंघात महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारा साठी गोंदिया शहरात काल रॅली काढण्यात आली. याच मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ प्रशांत पडोळे यांच्या प्रचारासाठी भंडारा गोंदिया जिल्ह्यातल्या सहा विधानसभा क्षेत्रात बाईक रॅली काढून प्रचार करण्यात आला.

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत परवा १९ तारखेला संपणार आहे. तर चौथ्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. चौथ्या टप्प्यात नऊ राज्य आणि एक केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या ११

मतदारसंघांचा समावेश आहे. चौथ्या टप्प्यासाठी या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत अर्ज दाखल करता येणार असून, १३ मे रोजी मतदान होणार आहे.

****

जालना लोकसभा मतदार संघासाठी उद्यापासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. याबाबत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी काल पत्रकार परिषदेत उमेदवारी अर्ज भरण्यासंबंधी सूचना केल्या. निवडणुकीच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात २३ स्थीर तर १८ भरारी पथकं तैनात करण्यात आली आहेत.

****

बीड मतदार संघातही चौथ्या टप्प्यात उद्यापासून अर्ज भरण्यास सुरवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी काल बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसराची आणि सर्व व्यवस्थेची पाहणी केली.

****

भगवान श्रीरामांचा जन्मोत्सव रामनवमी आज साजरी होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

अयोध्येत श्रीरामजन्म सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रभू श्रीरामाला सूर्याभिषेक करण्यात आला. रामनवमीनिमित्त मंदिराला आकर्षक रोषणाई करण्यात आली असून, अयोध्येत पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी तात्पुरती वैद्यकीय केंद्र आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं किराडपुरा तसंच समर्थ नगर भागातल्या राम मंदिरासह मराठवाड्यात ठिकठिकाणच्या राम मंदिरांमध्ये दुपारी १२ वाजता रामजन्म सोहळा उत्साहात साजरा करण्यात आली. सर्वच मंदीरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे.

नांदेड इथं श्रीराम नवमी निमित्त आज विश्व हिन्दू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती आणि दुर्गा वाहिनी तर्फे महावीर चौकातल्या पंचवटी हनुमान मंदिरापासून भव्य रॅली काढण्यात आली. सकाळी दहा वाजता पंचवटी हनुमान मंदिर इथं सामूहिक हनुमान चालीसा आणि आरती करून या रॅलीला प्रारंभ झाला. या रॅलीत श्रीरामलल्लाची आकर्षक मूर्ती ठेवण्यात आली होती. हजारो भाविकांनी या दुचाकी रॅलीत सहभाग घेतला होता.

शिर्डी इथं श्री साईबाबा मंदीरात संस्थानचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा यांनी सपत्निक श्रींची पाद्यपूजा केली. रामनवमीनिमित्त शिर्डी मध्ये उत्सव सुरु असून, शेकडो पालख्या दाखल झाल्या आहेत.
गोंदिया मध्ये आज राम नवमीचे औचित्य साधून बाईक रॅली काढण्यात आली.

****

महाराष्ट्र शासनाच्या वस्तू आणि सेवाकर विभागाने कर चुकवेगिरी प्रकरणात सहा कोटी ४० लाख रुपयांचा घोटाळा उघडकीस आणला आहे. मुंबईतल्या मोनोपोली इनोव्हेशन्स या कंपनीनं नोंदणी दाखला रद्द झालेल्या व्यापाऱ्याकडून खरेदी दाखवून तीन कोटी २३ लाख रुपयांची चुकीची कर वजावट घेऊन तसंच, मालाशिवाय फक्त बिलं देऊन तीन कोटी १७ लाख रुपयांची शासनाची महसूल हानी केल्याचे निदर्शनास आल्यानंतर या कंपनीवर कारवाई करण्यात आली.

****

समता पंधरवड्याच्या औचित्यानं बीड जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात विज्ञान शाखेच्या इयत्ता अकरावी आणि बारावीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही मोहीम आहे. पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेत जात पडताळणी समितीकडे अर्ज करावेत, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****